सोलापूर
तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २५ मार्च २०२६

आतील पानावर

पान २– रणवीरमुळे रडली होती दीपिका
पान ३– 'बॅटल ऑफ गलवान'चे नाव बदललं
पान ४– बॉलिवूडला लगाम लावण्याची वेळ आलीय
पान ५– रश्मिकाच्या 'मैसा'चे शुटिंग सुरू
पान ७– 'सालबर्डी'त गश्मीर महाजनी गोंधळीच्या रुपात

# राम गोपाल वर्माचा 'सरकार ४' येणार?

बॉलिवूडमध्ये सर्वात चर्चेतल्या आणि सुपरहिट सिनेमे देणाऱ्या दिग्दर्शकांमध्ये राम गोपाल वर्मा यांचे नाव येतं. 'सत्या', 'रंगीला', 'भूत' आणि 'सरकार' असे अनेक हटके सिनेमे त्यांनी दिले. या सिनेमांमधून त्यांचं वेगळेपण दिसून आलं. अमिताभ बच्चन यांच्या करिअरमध्ये 'सरकार' सिनेमाचं मोठं स्थान आहे. आतापर्यंत या पॉलिटिकल क्राइम ड्रामा सिनेमाचे तीन पार्ट आले आहेत. तर आता राम गोपाल वर्मा यांनी 'सरकार ४'ची घोषणा केली आहे. रेड लॉरी फिल्म फेस्टिवलवेळी राम गोपाल वर्मा म्हणाले, मी सरकार ४ बनवत आहे. याचं शूट पुढील महिन्यात सुरु होईल. शिवाय त्यांनी आणखी एक प्रोजेक्ट 'द सिंडिकेट'वरही भाष्य केलं. ते गंमतीत म्हणाले, हा सिनेमा माझे सगळे पाप धुवेल. २००५ साली 'सरकार' आला होता. अमिताभ बच्चन यांनी सुभाष नागरेची भूमिका साकारली होती. तर अभिषेक बच्चन त्यांच्या मुलाच्या शंकरच्या भूमिकेत होता. यानंतर २००८ मध्ये 'सरकार राज' आला. यामध्ये ऐश्वर्या रायही जोडली गेली. २०१७ साली 'सरकार ३' भेटीला आला. यामध्ये अमिताभ-अभिषेक यांच्यासोबत यामी गौतम, मनोज वाजपेयी आणि अमित साध हे कलाकार होते. आता 'सरकार ४'ची घोषणा होताच सिनेप्रेमींचीं उत्सुकता वाढली आहे. अद्याप कास्टिंगबद्दल माहिती आलेली नाही.





# प्रियांकाने म्हणून सोडले बॉलीवूड!

प्रियांका चोप्रा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. अभिनयाचा कोणताही वारसा नसताना तिने स्वबळावर इंडस्ट्रीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. परंतु, बॉलीवूडमध्ये अनेक वर्षे काम केल्यानंतर तिने इंडस्ट्री सोडण्याचा निर्णय घेतला आणि हॉलीवूडमध्ये काम करायला सुरुवात केली. अशातच अभिनेत्रीने बॉलीवूडबद्दल वक्तव्य केलं आहे. प्रियंकाने एका मुलाखतीत तिने २००० साली मिस वर्ल्डचा खिताब जिंकल्यानंतर thamiyan या तमिळ चित्रपटात काम केलेलं.

दाक्षिणात्य सुपरस्टार विजय यामध्ये प्रियांकाबरोबर महत्त्वपूर्ण भूमिकेत होता. त्यावेळी तिने पहिल्यांदाच कुठल्या तरी अभिनेत्याची लोकप्रियता इतक्या जवळून अनुभवली याबद्दल सांगितलं. प्रियांका म्हणाली, विजय जेव्हा सेटवर यायचे तेव्हा तिथे खूप गर्दी व्हायची. लोक फक्त त्यांना पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी करायचे. जेव्हा ते डान्स आणि अभिनय करायचे तेव्हा मी एकाग्रतेने त्यांचं काम बघत होते. तो माझा पहिलाच चित्रपट असल्याने पडद्यामागे गोष्टी कशा सुरू असतात याबद्दल मला काहीच माहीत नव्हतं. प्रियांकाने चित्रपटात काम केलं तेव्हा ती फक्त १८ वर्षांची होती. प्रियांका पुढे म्हणाली, मला आधी वाटायचं की लोक फक्त प्रसिद्धीसाठी या क्षेत्रात काम करतात. परंतु, प्रसिद्धी या क्षेत्रात काम करण्याचा फक्त एक फायदा आहे. खरं काम तर खूप वेगळं असतं. मी आत्तापर्यंत ७० चित्रपटांत काम केलं आहे. प्रियांका बॉलीवूड सोडण्यामागचं कारण सांगत म्हणाली, भारतात काम करत असताना मला तेच तेच केल्यासारखं वाटत होतं. एकाच पठडीतलं काम केल्यानंतर मला वेगळ्या गोष्टी करून पाहायच्या होत्या. काहीतरी नवीन करण्यासाठी संधीच्या शोधात होते. यावेळी प्रियंकासाठी बॉलीवूडमध्ये परिस्थिती अनुकूल नव्हती का असं विचारल्यानंतर ती म्हणाली, आयुष्यात कोणाचाच प्रवास सोपा नसतो, प्रत्येकजण त्याची लढाई लढत असतो.



# 'धुरंधर' पदरात न पडल्याची अक्षय कुमारला खंत

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार सध्या त्याच्या 'गोलमाल ५' मुळे चर्चेत आहे. विशेष म्हणजे या अभिनेत्याला धुरंधर सिनेमात काम करायची संधी न मिळाल्याची खंत व्यक्त केली आहे. अलिकडेच अक्षयने एका मुलाखतीमध्ये धुरंधर सिनेमावर त्याची प्रतिक्रिया दिली.

यावेळी त्याने धुरंधर सिनेमाचं कौतुक तर केलंच. परंतु, या सिनेमात काम करण्याची संधी न मिळाल्यामुळे खंतही व्यक्त केली. अक्षयने दिलेल्या मुलाखतीमध्ये सिनेमाच्या बदलत्या ट्रेंडविषयी भाष्य केलं. यात त्याने धुरंधरचं उदाहरणदेखील दिलं. धुरंधर ही एक ॲक्शन मुव्ही आहे. यात रक्तपात, मारामारी असं बरंच काही आहे. हा चांगला सिनेमा असल्यामुळे लोकही त्याच्यावर प्रेम करतायेत. रणवीर सिंहसारख्या अभिनेत्याने अँग्री यंग मॅन असलेली भूमिका उत्तमरित्या साकारली आहे. मध्यंतरी अशा भूमिका कुठेतरी हरवल्या होत्या, असं अक्षय म्हणाला. या मुलाखतीमध्ये अक्षयला धुरंधरचा भाग का झाला नाहीस? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर, ल्यारी गँगचा भाग होण्यासाठी मी योग्य नाही, असं कदाचित आदित्यला वाटलं असेल. त्यामुळे त्याने माझा या सिनेमासाठी विचार केला नाही. आणि मला कोणताही रोल दिला नाही, असं उत्तर अक्षयने दिलं.

# रणवीरमुळे रडली होती दीपिका



दीपिका पादुकोण व रणवीर सिंह बॉलीवूडमधील सेलिब्रिटी कपल आहे. दोघेही अनेकदा एकमेकांबद्दल मुलाखतींमधून बोलत असतात. पण, एकदा एका पुरस्कार सोहळ्यात रणवीर सिंहमुळे दीपिका पादुकोण रडली. रणवीर सिंह त्याच्या बोलक्या आणि मनमोकळ्या स्वभावासाठी ओळखला जातो. तो अनेकदा बायको दीपिकाबद्दलही खूप बोलत असतो आणि तिचं कौतुक करत असतो. पण, एकदा मात्र त्याच्यामुळे त्याच्या बायकोच्या डोळ्यांत अश्रू आले होते. २०१८ मध्ये पार पडलेल्या या पुरस्कार सोहळ्याला अनेक लोकप्रिय कलाकारांनी हजेरी लावली होती. त्यापैकीच एक म्हणजे दीपिका आणि रणवीर.

संजय लीला भन्साळी दिग्दर्शित 'पद्मावत' चित्रपटातील कामासाठी रणवीर सिंहला त्यावेळी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळालेला. त्यावेळी त्यानं मनोगत व्यक्त केलं होतं. पुरस्कार सोहळ्यातील भावनिक भाषणादरम्यान रणवीरनं दीपिकाचे आभार मानले होते. अभिनेता दीपिकाबद्दल म्हणालेला, चित्रपटात मला माझी राणी नाही मिळाली; पण खऱ्या आयुष्यात मला माझी राणी मिळाली. जर मी गेल्या सहा वर्षांत काहीही मिळवलं असेल, तर त्यामागचं कारण तू आहेस. तू मला नेहमीच कृतज्ञ राहायला शिकवलंस. रणवीर पुढे म्हणालेला, मला यावेळी मला ही संधी दिल्याबद्दल संजय लीला भन्साळी यांचेसुद्धा आभार मानायचे आहेत. तुम्ही मला कलाकार म्हणून घडवलं आहे. आय लव्ह यू सर! सगळ्या गोष्टींसाठी धन्यवाद! माझे आई-बाबा, बहीण- मी जे काही आहे, ते सगळं तुमच्यामुळे. सर्वांचे आभार. 'पद्मावत' चित्रपटात रणवीर व दीपिका यांनी एकत्र काम केलं होत.

रणवीरनं खलनायकाची भूमिका साकारली होती. रणवीरनं पुढे त्याच्या आजीला हा पुरस्कार समर्पित करीत भावना व्यक्त केल्या होता. अभिनेता म्हणालेला, मी हा पुरस्कार माझ्या आजीला समर्पित करत आहे. गेल्या वर्षी ती आम्हाला सोडून गेली. मला आठवतंय. तिच्या शेवटच्या दिवशी माझी बहीण तिच्याबरोबर होती. मी तिला बोलावलं आणि विचारलं की, आजी कशी आहे, ती काय करतेय? त्यावर तिनं मला आजी 'खली बली' गाणं ऐकत आहे, असं म्हणालेली. जे ती दररोज नाश्ता करताना ऐकते. त्यानंतर मला जो फोन आला तेव्हा कळलं की, ती आम्हाला सोडून गेली आणि त्यावेळी ती माझं तेच गाणं ऐकत होती. त्यामुळे आजी मला माहीत आहे तू मला वरून आशीर्वाद देत आहेस. मला तुझी खूप आठवण येते. हा पुरस्कार तुझ्यासाठी आहे.

# ... म्हणून शाहरुखसारखं स्टारडम इतरांना मिळवता आलं नाही?

बॉलिवूडचा किंग खान अशी ओळख असलेला अभिनेता शाहरुख खान हा हिंदी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. दिलीप कुमार आणि अमिताभ बच्चन यांच्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीचा विशिष्ट काळ गाजवणारा अभिनेता म्हणूनही त्याची ओळख आहे. शाहरुख खानचा जगभरात मोठा चाहतावर्ग आहे. अभिनेत्याची एक झलक पाहण्यासाठी चाहते वाट पाहत असतात.



मात्र, आता अभिनेता सुनील शेट्टीने शाहरुखच्या या स्टारडमबद्दल दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आहे. अलिकडेच सुनील शेट्टीने एका पॉडकास्टमध्ये हजेरी लावली. या पॉडकास्टमध्ये सुनील शेट्टीला विचारण्यात आलं की शाहरुख खानसारखं स्टारडम इतर कोणत्याही अभिनेत्याला का मिळवता आलं नाही? यावर उत्तर देत अभिनेता म्हणाला, शाहरुखच्या सिनेमातील संगीत हे कायमच उत्तम असायचं आणि भारतात संगीताला खूप महत्त्व आहे. त्याच्या पाठीशी यशजींसारखे दिग्गज होते. त्यानंतर मग अभिनेता शाहरुखचं कौतुक करत म्हणाला, शाहरुख आपल्या कलेप्रती पूर्णपणे समर्पित असून तो स्वत:ला नव्याने घडवत असतो. तो माणूस म्हणूनही तितकाच उत्तम आहे आणि त्याची इतरांकडूनही तिच अपेक्षा असते. जिथे गरज असते तिथे शाहरुख कायम हजर असतो. इतकंच नाही तर सुनील शेट्टी पुढे म्हणाला, शाहरुख खान सोशल मीडियामध्ये अडकत नाही. तो सोशल मीडियावर पोस्ट करण्यावर विश्वास ठेवत नाही. या पिढीतील मुलांना असे वाटतं की सोशल मीडियावर बातम्या पसरवल्याने त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल.पण, असं काही नाही.

# रामायणात 'हा' अभिनेता साकारणार सुग्रीव

दिग्दर्शक नितेश तिवारी यांचा बहुचर्चित 'रामायण' चित्रपट सध्या भारतीय चित्रपटसृष्टीत चर्चेत आहे. या चित्रपटातील प्रत्येक पात्राच्या कास्टिंगबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता असतानाच आता सुग्रीवाच्या भूमिकेसाठी एका लोकप्रिय अभिनेत्याची निवड करण्यात आली आहे. 'शर्माजी नम कीन' आणि 'उडता पंजाब' यांसारख्या चित्रपटांतून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवणारा अभिनेता सुहेल नायर आता या पौराणिक महाकाव्यात सुग्रीवाची महत्त्वपूर्ण भूमिका साकारताना दिसणार आहे. माहितीनुसार, सुहैल नायरने या भूमिकेची ऑफर स्वीकारली असून त्याने आपल्या भागाच्या चित्रीकरणाला सुरुवातही केली आहे. सीता मातेच्या शोधात आणि रावणाविरुद्धच्या युद्धात श्रीरामांना सुग्रीवाने मोलाची साथ दिली होती, हे आपल्याला माहितच आहे. सुहैल नायर ही आव्हानात्मक भूमिकेत कशी साकारणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. यापूर्वी 'पंचायत' फेम अभिनेता फैसल मलिक याला कुंभकर्णाच्या भूमिकेसाठी निवडल्याची चर्चा होती, त्यानंतर सुहैलची एन्ट्री ही या चित्रपटासाठी दुसरी मोठी



कास्टिंग अपडेट मानली जात आहे. हा चित्रपट भारतीय सिनेसृष्टीतील सर्वात महागडा चित्रपट असणार असून, निर्मात्यांनी यासाठी सुमारे ४००० कोटी रुपयांचे बजेट निश्चित केल्याचे बोलले जात आहे.

चित्रपटात रणबीर कपूर प्रभू श्रीरामांच्या भूमिकेत, साई पल्लवी सीता मातेच्या भूमिकेत आणि दाक्षिणात्य सुपरस्टार यश रावणाच्या भूमिकेत दिसणार आहे. याव्यतिरिक्त सनी देओल हनुमानाची तर लारा दत्ता कैकेयीची भूमिका साकारणार असल्याची चर्चा आहे. हा भव्य चित्रपट दोन भागात प्रदर्शित करण्याची योजना असून, पहिला भाग दिवाळी २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तर दुसरा भाग पुढील वर्षीच्या दिवाळीत अर्थात २०२७ ला प्रदर्शित होणार आहे. सध्या या चित्रपटाचे पोस्ट- प्रॉडक्शन आणि व्हीएफएक्सवर काम सुरू आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे संगीतकार आणि तंत्रज्ञ या प्रोजेक्टवर काम करत आहेत.

# 'बॅटल ऑफ गलवान'चे नाव बदललं



बॉलीवूडचा सुपरस्टार सलमान खान सध्या त्याच्या आगामी प्रोजेक्ट्समुळे चर्चेत आहे. त्याच्या 'बॅटल ऑफ गलवान' या बहुप्रतीक्षित चित्रपटाची गेले काही दिवस चर्चा आहे. अशातच आता या चित्रपटाबद्दलची महत्वाची अपडेट येत आहे. सलमान खानच्या आगामी 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटाचे नाव बदलण्यात आले आहे. मात्र, आता हे नाव बदलून 'मातृभूमी में वॉर रेस्ट इन पीस' असे करण्यात आले आहे. चित्रपटाचे नवीन पोस्टर शेअर करत सलमानने ही माहिती दिली. जानेवारी महिन्यात सलमान खानने या चित्रपटातील 'मातृभूमी' हे देशभक्तिपर गाणे रिलीज केले होते. याच गाण्याच्या नावावरून चित्रपटाचे शीर्षक ठेवण्यात आले आहे. हे गाणे अरिजीत सिंह आणि श्रेया घोषाल यांनी गायले असून, गीत समीर अंजान यांनी लिहिले आहे, तर संगीत हिमेश रेशमिया यांनी दिले आहे. चित्रपटाच्या नवीन पोस्टरमध्ये सलमान खान रक्ताने माखलेल्या आणि जखमी अवस्थेत दिसत आहे. काट्यांच्या तारा गुंडाळलेला एक खांब तो स्वत:वर आदळण्यापासून रोखताना दिसत असून त्यावर 'मातृभूमी' हे नवीन नाव ठळकपणे दिसत आहे. या पोस्टरवरील आणखी एक गोष्ट लक्ष वेधून घेत आहे, ती म्हणजे पोस्टरवर चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख देण्यात आलेली नाही. याआधी चित्रपटाची प्रदर्शनाची तारीख ही १० एप्रिल जाहीर करण्यात आली होती, मात्र या नवीन पोस्टरवर प्रदर्शनाची कोणतीही तारीख देण्यात आलेली नाही. सलमानच्या चित्रपटाच्या या नवीन नावामुळे आता चाहत्यांमध्ये चित्रपटाबाबत उत्सुकता वाढली आहे. सोशल मीडियावर सध्या या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. डिसेंबरमध्ये रिलीज झालेल्या या चित्रपटाच्या टीझरमध्ये सलमान पूर्व लडाखमध्ये चिनी सैनिकांशी लढा देताना दिसला होता. मात्र, या टीझरवर सोशल मीडियावर बरीच टीका झाली होती. २०२० मधील भारत आणि चीन यांच्यातील गलवान संघर्षावर आधारित असलेल्या या चित्रपटामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरही वाद निर्माण झाला. चीनमधील प्रसारमाध्यमांनी हा चित्रपट तथ्यावर आधारित नसल्याचे म्हटले होते, यामुळेच चित्रपटाचे नाव बदलले असल्याची चर्चा सध्या सुरू आहे.

# बॉलिवूडला लगाम लावण्याची वेळ आलीय



सध्या इंटरनेटवर एका गाण्याने मोठा वाद निर्माण केला आहे. कन्नड चित्रपट 'केडी: द डेविल' मधील 'सरके चुनर तेरी सरके' हे गाणं वादाच्या भोवऱ्यात सापडलं आहे. नोरा फतेही आणि संजय दत्त यांच्यावर चित्रित झालेल्या या गाण्यातील अश्लीलतेमुळे हे गाणं मोठ्या प्रमाणावर ट्रोल केलं जात आहे. वाढता विरोध पाहून या गाण्याचं हिंदी व्हर्जन सर्व प्लॅटफॉर्मवरून हटवण्यात आलं असून लवकरच त्याचं नवीन व्हर्जन रिलीज केलं जाणार आहे. मात्र या गाण्यावरून सुरू झालेला वाद अद्याप थांबलेला नाही. अभिनेत्री आणि भाजपा खासदार कंगना राणौतने या गाण्यावर टीका केली आहे. संसदेबाहेर प्रसारमाध्यमांशी बोलताना कंगनाने आपला संताप व्यक्त केला. ती म्हणाली, अश्लीलता आणि चीप पीआर स्टंट्सच्या माध्यमातून लक्ष वेधून घेण्यासाठी बॉलिवूडने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. संपूर्ण देश त्यांचा धिक्कार करत आहे, त्यांना फटकारत आहे. पण मला वाटत नाही की त्यांना काही लाज उरली आहे. अशा प्रकारची गाणी आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत, ही काही नवीन गोष्ट नाही. मधल्या काळात त्यांच्यावर निर्बंध आले होते आणि आता मला वाटतं की त्यांच्यावर अधिक कडक कारवाई होण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या अश्लीलतेच्या प्रदर्शनामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांवर वाईट परिणाम होतो. कुटुंबासोबत बसून टीव्ही पाहणं कठीण झालं आहे. मला वाटतं आता बॉलिवूडला लगाम लावण्याची वेळ आली आहे. 'सरके चुनर तेरी' या गाण्याचे गीतकार रकीब आलम यांनाही युजर्सनी जबरदस्त ट्रोल केलं आहे. या टीकेनंतर रकीब यांनी आपली प्रतिक्रिया दिली आणि या गाण्याशी जोडले गेल्याबद्दल माफीही मागितली. आलम यांनी स्पष्ट केलं की, हे शब्द त्यांनी स्वतः लिहिलेले नसून चित्रपटाचे दिग्दर्शक प्रेम यांनी लिहिले आहेत. ते म्हणाले, मी हे बोल लिहिलेले नाहीत. दिग्दर्शक प्रेम यांनी ते कन्नड भाषेत लिहिले होते. जेव्हा मला हे गाणं लिहिण्यास सांगितलं गेलं, तेव्हा मी नकार दिला होता. मी त्यांना सांगितलं होतं की अशी गाणी चालणार नाहीत आणि सेन्सॉर होतील. पण त्यांनी मला फक्त कन्नड व्हर्जनचं ट्रान्सलेशन करून देण्यास सांगितलं. 'चूसेगा', 'चाटेगा' यांसारखे शब्द मूळ गाण्यातच होते.




# ब्लॉकबस्टर चित्रपटाचा सिक्वेल येतोय

भारतीय चित्रपटसृष्टी मध्ये राजनीती या विषयावर अनेक चित्रपट आले मात्र जास्त चर्चेत राहिलेला चित्रपट म्हणजे राजनीती. हा चित्रपट २०१० साली प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कमाई केली, मात्र प्रेक्षकांच्या मनात घर निर्माण केले. तर या चित्रपटाच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे, ती म्हणजे दिग्दर्शक प्रकाश झा यांनी या चित्रपटाच्या सिक्वेलवर काम सुरू केले आहे. २०२५ मध्ये चित्रपटाच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी अधिकृतपणे राजनीती २ ची घोषणा केली आणि अलीकडेच पुष्टी केली की हा चित्रपट सध्या प्री-प्रॉडक्शनमध्ये आहे. राजनीती केवळ तिच्या कथेसाठीच नाही तर कतरिना कैफच्या उल्लेखनीय अभिनय परिवर्तनासाठी देखील ओळखली जातो. या चित्रपटापूर्वी, ती प्रामुख्याने ग्लॅमरस भूमिकांसाठी ओळखली जात होती, परंतु प्रकाश झा या चित्रपटाने तिला एक गंभीर भुमिका करणारी अभिनेत्री म्हणून स्थापित केले. इंदू या चित्रपटाचे तिच्या भूमिकेचे केवळ सामान्य लोकांनीच नव्हे तर चित्रपट उद्योगातील आघाडीच्या कलाकारांनीही कौतुक केले. या चित्रपटाच्या यशाने कतरिनाच्या कारकिर्दीला एक नवीन दिशा,उंची दिली, ज्यामुळे तिला आव्हानात्मक भूमिका स्वीकारण्याचा मार्ग मोकळा झाला. हा चित्रपट २०१० मध्ये बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई करत होता, त्याने त्याच्या बजेटच्या जवळजवळ तिप्पट किंवा १४५ कोटी कमाई केली. चित्रपटाच्या यशाचा एक महत्वाचा भाग त्याच्या शक्तिशाली स्टारकास्टमुळे आहे. रणबीर आणि कतरिना व्यतिरिक्त, अजय देवगण, नाना पाटेकर, मनोज बाजपेयी, अर्जुन रामपाल आणि नसीरुद्दीन शाह यांसारख्या अनुभवी कलाकारांनीही आपले अभिनय सादर केले.



# 'रफ्तार'मध्ये राजकुमार राव-कीर्ती सुरेश एकत्र

बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव यांच्या आगामी चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. 'रफ्तार' असे या नव्या चित्रपटाचे नाव असून या चित्रपटात त्यांच्या सोबत दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्री कीर्ती सुरेश मुख्य भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाची घोषणा होताच चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य निंबालकर करत आहेत. तर निर्मितीची जबाबदारी राजकुमार राव यांची पत्नी आणि अभिनेत्री पत्रलेखा यांनी त्यांच्या 'कम्पा फिल्म' या बॅनरखाली घेतली आहे. चित्रपटाची कथा वेगाने वाढणाऱ्या स्टार्टअप जगावर आधारित असल्याचे सांगितले जात आहे. 'रफ्तार' हा चित्रपट महत्त्वाकांक्षा, यश आणि नात्यांमधील संघर्ष यावर आधारित आहे. या चित्रपटात एक मुलगा आणि मुलीची कथा दाखवली जाणार आहे. दोघेही आयुष्यात मोठे यश मिळवण्याचे स्वप्न पाहतात आणि स्टार्टअपच्या जगात आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. मात्र जसे-जसे त्यांना पैसा, ताकद आणि प्रसिद्धी मिळू लागते, तसे-तसे त्यांच्या नात्यावरही परिणाम होऊ लागतो. यशाच्या मागे धावताना माणूस किती मोठी किंमत मोजतो, हा प्रश्नही चित्रपटातून उपस्थित केला जाणार आहे. या कथेत भारतातील व्यावसायिक शिक्षण व्यवस्थेवरही हलक्या फुलक्या पद्धतीने भाष्य करण्यात येणार आहे. अनेक वेळा ज्ञानापेक्षा नफा आणि व्यवसायाला जास्त महत्त्व दिले जाते, ही वास्तव परिस्थिती चित्रपटातून दाखवली जाणार आहे. 'रफ्तार' हे नाव पाहून अनेकांनी हा चित्रपट प्रसिद्ध रॅपर रफ्तार यांच्या जीवनावर आधारित बायोपिक असू शकतो असा अंदाज व्यक्त केला. मात्र निर्माते किंवा चित्रपटाशी संबंधित कोणत्याही अधिकृत व्यक्तीने हा चित्रपट रॅपर रफ्तार यांच्या जीवनावर आधारित असल्याचे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे हा केवळ चाहत्यांचा अंदाज असल्याचे मानले जात आहे. या चित्रपटात राजकुमार राव आणि कीर्ती सुरेश यांच्यासोबत अनेक दमदार कलाकार दिसणार आहेत. त्यात तान्या मानिकतला, रजत कपूर, अनुराग ठाकुर आणि रोहन वर्मा यांच्याही महत्त्वाच्या भूमिका असणार आहेत. 'रफ्तार' हा चित्रपट २४ जुलै २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. वेगळी कथा, दमदार कलाकार आणि स्टार्टअप जगाची पार्श्वभूमी यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.



# अनुष्का शेट्टी बिजनेसमॅनसोबत बांधणार लग्नगाठ?



साऊथ सिनेसृष्टीत सध्या सनई चौघडे वाजत आहेत. नुकतंच रश्मिका मंदाना आणि विजय देवराकोंडा यांनी पारंपरिक पद्धतीने लग्न करत नव्या आयुष्याला सुरुवात केली आहे. त्यानंतर आता साऊथ ब्युटी अनुष्का शेट्टीच्या लग्नाच्या चर्चा रंगल्या आहेत. अनुष्का शेट्टी ४४ व्या वर्षी लग्नगाठ बांधणार असल्याच्या जोरदार चर्चा सुरू आहेत. अनुष्का शेट्टी बंगळुरूमधील एका बिजनेसमॅनसोबत लग्न करणार आहे. तिचा होणारा नवरा कोण आहे? याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. अनुष्का शेट्टी अरेंज मॅरेज पद्धतीने लग्न करणार असल्याचंही समोर आलं आहे. अभिनेत्रीच्या लग्नाची बातमी ऐकताच चाहतेही खूश झाले आहेत. चाहते अनुष्काच्या लग्नाची आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र अद्याप अनुष्काने तिच्या लग्नाबद्दल कोणतीही माहिती दिलेली नाही. अनुष्का शेट्टीला 'बाहुबली' या सिनेमामुळे प्रसिद्धी मिळाली होती. या सिनेमात तिने देवसेना ही भूमिका साकारली होती. या सिनेमात अभिनेता प्रभास मुख्य भूमिकेत होता. सिनेमा सुपरहिट झाल्यानंतर अनुष्का शेट्टीचं नाव प्रभाससोबत जोडलं गेलं होतं. त्यांच्या लग्नाच्या चर्चाही रंगल्या होत्या. मात्र मैत्री सोडून इतर कुठलंच नातं नसल्याचं अभिनेत्रीने स्पष्ट केलं होतं. अनुष्काने अनेक साऊथ सिनेमांमध्ये काम केलं आहे. 'अरुंधती', 'सिंघम', 'लिंगा', 'साहो', 'वेदम' अशा सिनेमांमध्ये ती दिसली होती. २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'घाटी' सिनेमात अनुष्काने ॲक्शन सीन्सही केले होते.



# थलपति विजय तृषाशी करणार लग्न?

साऊथ स्टार थलपति विजय त्याच्या पर्सनल आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. थलपति विजयची पत्नी संगीताने त्याच्यावर एक्स्ट्रा मॅरेटिअल अफेअरचे आरोप करत घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे त्यांचा २७ वर्षांचा संसार मोडणार आहे. थलपति विजयचं नाव साऊथ ब्युटी तृषा क्रिष्णनसोबत जोडलं जात आहे. घटस्फोटाच्या चर्चा सुरू असतानाच थलपति विजय आणि तृषा एका लग्नात एकत्र दिसले होते. आता पत्नीला घटस्फोट दिल्यानंतर थलपति विजय तृषाशी लग्न करणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. तृषासोबत लग्न करून थलपति विजय त्यांचं रिलेशनशिप ऑफिशियल करणार असल्याचं बोललं जात आहे. पहिली पत्नी संगीताला घटस्फोट दिल्यानंतर थलपति विजय तृषाशी लग्न करणार असल्याची एक पोस्ट सध्या व्हायरल होते आहे. यामध्ये थलपति विजय आणि तृषा लग्न करणार असल्याचं म्हटलं गेलं आहे. निवडणुकीनंतर ते दोघे लग्न करणार असल्याचंही या पोस्टमध्ये म्हटलं आहे. सोशल मीडियावर फिरणारी ही पोस्ट तृषाच्या आईने लाइक केली आहे. त्यामुळे थलपति विजय आणि तृषा क्रिष्णन लग्न करणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान, थलपति विजय आणि संगीता यांनी १९९९ मध्ये लग्न केलं होतं. त्यांना दोन मुलं आहेत.

थलपति विजयने अभिनयातून संन्यास घेतला असून आता तो पूर्णवेळ राजकारणात सक्रिय झाला आहे. थलपति विजय आणि तृषाने अनेक सिनेमांमध्ये एकत्र काम केलं आहे. गेल्या काही वर्षांपासून त्यांचं अफेअर सुरू असल्याचं म्हटलं जात आहे.

# रश्मिकाच्या 'मैसा'चे शुटिंग सुरू

साऊथ ब्युटी रश्मिका मंदाना आणि विजय देवराकोंडा काही दिवसांपूर्वीच लग्नाच्या बेडीत अडकले आहेत. रश्मिका-विजयने २६ फेब्रुवारीला पारंपरिक पद्धतीने लग्नगाठ बांधली. त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. लग्नानंतर काहीच दिवसांनी रश्मिका पुन्हा एकदा कामावर परतली आहे. २०२६ मधील चर्चेत असलेल्या 'मैसा' या चित्रपटाच्या शूटिंगला तिने पुन्हा सुरुवात केली आहे. 'अनफॉर्मूला फिल्म्स'च्या बॅनरखाली तयार होत असलेला हा चित्रपट रश्मिकाच्या करिअरमधील एक मोठा प्रोजेक्ट मानला जात आहे. या चित्रपटात रश्मिका एका अत्यंत शक्तिशाली आणि उग्र भूमिकेत दिसणार आहे. तिच्या आधीच्या प्रतिमेपेक्षा पूर्णपणे वेगळा अवतार यात पाहायला मिळणार असल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. लग्न आणि त्यानंतरच्या सर्व समारंभांनंतर रश्मिका आता अधिकृतपणे चित्रपटाच्या सेटवर परतली आहे. तिने आपल्या इंस्टाग्रामवर दिग्दर्शक रविंद्र यांच्या स्टोरीला रीपोस्ट करत शूटिंगची एक झलक शेअर केली. या व्हिज्युअलमध्ये संपूर्ण टीम मोठ्या आणि मोकळ्या लोकेशनवर शूटिंग करताना दिसत आहे. यावरुन चित्रपटाची कथा गंभीर आणि थरारक असणार असल्याचा अंदाज येतो. या पोस्टसोबत The Hunt Beginr (शिकार सुरू झाली आहे) असं कॅप्शन देण्यात आलं आहे. अलीकडेच मेकर्सनी 'मैसा'ची पहिली झलकही प्रदर्शित केली होती, ज्याने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातला. रश्मिकाचा इंटेन्स आणि रॉ लुक, तसेच दमदार बॅकग्राउंड स्कोअरचीही जोरदार चर्चा होत आहे. संगीत आणि जबरदस्त ॲक्शन सीन्समुळे हा चित्रपट प्रेक्षकांना वेगळा सिनेमॅटिक अनुभव देणार आहे. 'अनफॉर्मूला फिल्म्स'च्या निर्मितीत आणि रविंद्र पुल्ले यांच्या दिग्दर्शनाखाली बनणारा 'मैसा' हा एक इमोशनल ॲक्शन थ्रिलर चित्रपट आहे. आदिवासी भागावर आधारित असलेली ही कथा भव्य दृश्ये, दमदार कथानक आणि रश्मिकाची लक्षात राहणारी भूमिका यांचे आश्वासन देते.





# हिदमचा बादशहा संगीतकार: ओ. पी. नय्यर

'बहुत शुक्रिया बडी मेहरबानी... आऽ आऽऽ च्या आलापीनंतर नतमस्तक भावातील मोहम्मद रफी यांचे आर्जवाचे स्वर आर्ततेत कधी सामावतात कळत नाही! ही जादू ओपीच करू शकतात. आस्मानी सौंदर्याची साधना पुढे उभी असताना जॉय मुखर्जी बेहोशीत हे गाणे म्हणतात 'एक मुसाफिर एक हसीना' चित्रपटात. 'मुझे डर है मुझको गुरुर आ ना जाये...' इथेही आलापीनंतर आशाताईंनी प्रांजळपणे आळवलेले स्वर कधी मार्दव होतात कळत नाही. मातीच्या वासामुळे निर्माण होणारा आल्हादी मूड उजागर करणार्या 'पिलू' या आवडत्या रागात ओपींनीवरील रागिणी बांधली आहे.

१९५८ सालच्या 'फागून' चित्रपटात जवळपास सर्वच गाणी पिलू रागात तयार केली. 'पिया पिया ना लागे मोरा जिया' 'पिया पिया' म्हणताना दुसरा 'पिया' आशाताईंनी अलगद सुखद दिलासा देऊन गायला आहे. एकच शब्द वैविध्यतेने नटवूनही स्वर हलू न देता गाणे गाणे घेणे ही किमया सर्वांना साधत नाही. 'जंगल की मोरनी आयी बागोंके मोर से मिलने' भारत भूषण बासरी वाजवून दोन कडव्यांची वीण विणतात तर लावण्यलतिका मधुबाला मोराच्या अभिनयात नृत्य करतात. ओपींच्या गाण्यात काव्यस्पर्श नसतो, असा आरोप असूनही त्यांचे सूर शब्दांना सहजपणे कुरवाळतात.

'सुन सुन सुन सुन जालिमा प्यार हमको तुमसे हो गया' १९५४ च्या 'आरपार' सिनेमात रफींनी 'सुन सुन' गाताना प्रत्येक वेळी हलका पॉज घेऊन 'जालिमा'चा स्वर लांबवून नखरेल अंदाज पेश केला आहे. 'बाबुजी धीरे चलना प्यारमे जरा संभलना' 'आरपार'मध्ये गीता दत्त यांची 'हे,हे,हे,हे' अशा वैशिष्ट्यपूर्ण आलापीच्या शैलीचा शिताफीने उपयोग ओपींनी केला. अकॉर्डियनच्या मस्तीभर्या सुरात गाण्यात मदहोश निर्माण केला, ज्याची झिंग आजही कायम आहे. 'बेईमान बालमा मान भी जा' 'हम सब चोर है' सिनेमात रुसलेल्या शम्मी कपूरला अमिता आशा यांच्या आवाजात गोड आर्जवात मनवताना मजा येते. 'देख कसम से, कसम से कह दो ना...' 'तुमसा नही देखा' सिनेमातही जोडी आहे. यात मात्र शम्मी कपूर अमिताच्या आर्जवावर म्हणतो, 'क्या लगाई तुमने इस कसम कसम से... अन् नाराज शम्मी अमिताला शरण जातो. 'ऐ दिल है मुश्किल जीना यहाँ' 'सीआयडी'मधील या गाण्यात रफींकडून ओपींनी अनोखे बोल 'हा हा, हो हो, ही ही, जरा हटके' दिलखुलास अंदाजात अक्षरशः आळवून घेतले व गाण्यात खुमार आणली. अशा गमती गाण्यात करूनही स्वर मात्र शब्दांना धरून असायचे. 'ये देश है वीर जवानो का...' देशभक्तीवर आधारलेले रफी व बलबीर यांनी गायलेले हे गीत आजही १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी देशभर गुंजत असते. पंजाबी मातीतले ओ. पी. नय्यर यांनी पंजाबी लोकगीतातील भांगडा तालाच्या वेगवान लयीवर हे गीत बसविले. एका अतिशय ऊर्जावान गीताचे योगदान दिले. 'ये देश है दुनिया का गहना' म्हणताना 'गहना' शब्द लांबवून मुलखावेगळी जादू केली. पंजाबमधील जुन्या काळातील वाद्याचा उपयोग करून परंपरा जपली. 'आईये मेहरबान बैठीये जाने जा' पंजाबी ठेक्याचा लहेजा स्वरातून उजागर करणार्या आशा भोसले यांना सलाम! 'आईये' स्वर ऐकताच कलेजा खल्लास! नंतर 'शौकसे किजीये-' किंचित दृतात घेऊन 'इश्क के इम्तहाँ' म्हणताना स्वर सैल सोडून समा साधण्याचा अनोखा प्रकार. केवळ ग्रेट! 'मेरा नाम चिं चिं चु' 'हावडा ब्रिज'मधील एकेकाळी देशभर जल्लोष माजविणार्या या गाण्याच्या सुरुवातीची धून एस. हजारासिंग या गिटार वादकाने वाजविली. यात वेस्टर्न ट्यून, गिटार ड्रम्स व माऊथ ऑर्गनचा वापर शिताफीने करून ओपींनी हे आयटम नृत्य गीत सदाबहार व अजरामर बनविले. ओंकार प्रसाद नय्यर उर्फ ओ. पी. नय्यर यांचा जन्म १६ जानेवारी १९२६ रोजी लाहोर येथे झाला. संगीताचे रीतसर कुठलेही शिक्षण घेतले नाही. संगीत कलेत सृजनासाठी शास्त्रीय ज्ञान आवश्यक असतेच असे नाही, हे त्यांनी सिद्ध केले. ते निर्मितीक्षम होऊनच जन्माला आले होते. त्यांनी पक्क्या गायकीचे संस्कार करून घेतले होते. कुठल्याही गाण्याची चाल ते १५ मिनिटात बांधायचे. कॉलेज शिकतानाच त्यांनी सी. एच. आत्मा यांच्याकडून दोन गाणी म्हणून घेतली. एचएमव्हीने त्याच्या रेकॉर्ड केल्या. फाळणीनंतर मुंबईत आल्यावर 'कनिज' चित्रपटाला पार्श्वसंगीत दिले. दलसुख पांचाली यांनी १९५२ साली 'आसमान' चित्रपटाला पहिले स्वतंत्र संगीत दिले. त्याच सुमारास त्यांचा विवाह झाला. त्यातील गीता दत्त यांनी गायलेले 'देखो जादू भरे मोरे नैना' हे गाणे नंतर सिलोन रेडिओने सिग्नेचर ट्यून म्हणून वापरले. नंतर लागोपाठ पाच-सहा चित्रपट फ्लॉप झाले व पंजाबला वापस जाण्याचा विचार केला. तेव्हा गुरुदत्त यांनी १९५४ साली 'आरपार' चित्रपट दिल्यावर त्यांनी १९७० पर्यंत मागे वळून पाहिले नाही. ओपींनी जवळपास ६० हिंदी व एका तेलगू चित्रपटाला संगीत दिले. १९५८ 'नया दौर' चित्रपटात उत्कृष्ट संगीतकार म्हणून फिल्म फेअर पुरस्कार मिळाला, त्यांनी तो नाकारला! १९५७ 'सी. आय. डी.' व १९५९ 'फागून'साठी फिल्म फेअरसाठी नामांकन. 'निरंजनम' या तेलगू चित्रपटासाठी राज्य सरकार पुरस्कार. मध्य प्रदेश सरकारचा लता मंगेशकर पुरस्कारही त्यांनी नाकारला. 'मेड फॉर इच अदर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या संगीतातील जोडीला दृष्ट लागली व ७० च्या दशकात ते विलग झालेत. पुढील जीवन विपण्णावस्थेत व एकांतात आपला आवडता स्वर ऐकत ऐकत शांततेत जगले. 'पूछो ना हमे...' गाणे ऐकता ऐकता २८ जानेवारी २००७ रोजी हा हिदमचा बादशहा कालवश झाला. त्यांच्या अन्त्यविधीला चित्रपटसृष्टीतील अवघे दोन ते तीन कलाकार उपस्थित होते... कालाय तस्मै नमः! 'तेरा कोई साथ ना दे तू खुदसे प्रीती जोड ले चल अकेला...' हेच खरे...

**रमेश पोफळी**

# ... म्हणून अमृता सिंहने केलं नाही दुसरं लग्न?

बॉलिवूडमध्ये सगळ्यात जास्त कोणाच्या घटस्फोटाची चर्चा झाली असेल तर ती म्हणजे अभिनेता सैफ अली खान आणि अमृता सिंह यांची. ही जोडी विभक्त होऊन आज बरीच वर्ष झाली. मात्र, तरीदेखील त्यांच्याविषयी नेटकऱ्यांमध्ये वरचेवर चर्चा होते. घटस्फोटानंतर सैफने त्याचा दुसरा संसार थाटला. परंतु, अमृताने सिंगल मदर होऊन मुलांचं पालकत्व स्वीकारलं. एका मुलाखतीमध्ये तिने दुसरं लग्न का केलं नाही, यामागचं कारण सांगितलं. १९९१ मध्ये अमृता आणि सैफने लग्न केलं. त्यावेळी सैफचं वय २१ होतं. तर, अमृता ३३ वर्षांची होती. ज्यावेळी या जोडीने लग्न केलं तेव्हा अमृता एक यशस्वी अभिनेत्री होती. तर, सैफने त्याच्या करिअरला सुरुवातही केली नव्हती. त्यामुळे या दोन कारणांमुळे त्यांची बरीच चर्चा झाली. परंतु, या सगळ्याकडे दुर्लक्ष करत



त्यांनी संसार केला. सूत्रांच्या माहितीनुसार, सैफ आणि अमृता विभक्त होण्यामागे सैफची आई अभिनेत्री शर्मिला टागोर आणि बहिणी सबा, सोहा कारणीभूत असल्याचं म्हटलं जातं. या तिघींसोबत अमृताचे मतभेद होते. ज्यामुळे घरात वारंवार वाद व्हायचे. परिणामी, लग्नाच्या १३ वर्षांनंतर या जोडीने २००४ मध्ये कायदेशीररित्या घटस्फोट घेतला. घटस्फोटानंतर २०१२ मध्ये सैफने करिना कपूरसोबत दुसऱ्यांदा लग्नगाठ बांधली. तर, अमृता आजही अविवाहित आहे. एका मुलाखतीमध्ये तिने दुसरं लग्न न करण्यामागचं कारण सांगितलं. घटस्फोटानंतर तिने तिच्या दोन्ही मुलांची सारा आणि इब्राहिम यांची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे मुलांचा योग्यरित्या सांभाळ व्हावा. त्यांच्या संगोपनात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी तिने दुसरं लग्न न करण्याचा निर्णय घेतला.

# अकरा वर्षे झाली तरी, लग्नाचा अल्बम बनवला नाही



मराठी संगीत क्षेत्रातील लोकप्रिय गायिका प्रियांका बर्वे आणि संगीतकार सारंग कुलकर्णी यांच्या लग्नाला नुकतीच ११ वर्षे पूर्ण झाली. २००७ मध्ये या दोघांची पहिली भेट सवाई गंधर्व महोत्सवात झाली होती. पुढे, दोघांची छान मैत्री झाली आणि कालांतराने त्यांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. पण, तुम्हाला माहितीये का? प्रियांका आणि सारंग यांच्या लक्षात आहेत. खरंतर, सारंगचे जे काका आहेत त्यांनीच आम चे फोटो काढले होते. त्यातून आम्हाला फोटो सिलेक्ट करून सांगायचे होते आणि लग्नाचा अल्बम बनवून घ्यायचा होता. कारण, आई-बाबांनी सांगितलं होतं आता लग्न आम्ही लावून दिलंय. फोटोंचा अल्बम वगैरे तुम्ही बघा. तो अल्बम आजपर्यंत राहून गेलंय. मी वाट बघतेय की, सारंग कुठल्यातरी लग्नाच्या वाढदिवसाला तो

लग्नाला आता ११ वर्षे पूर्ण झालीयेत तरीही त्यांच्या लग्नाच्या फोटोंचा अल्बम अजूनही बनवण्यात आलेला नाहीये. प्रियांका म्हणाली, मोठी गंमत म्हणजे आमच्या लग्नातील फोटोंचा अल्बम आजतागायत नाहीये. ही एकमेव जबाबदारी सारंगवर होती पण, आज लग्नाला ११ वर्षे झालीयेत तरीही मी आमच्या लग्नाचे फोटो आजवर पाहिलेले नाहीयेत. त्यामुळेच लग्नातील सगळ्या आठवणी आमच्या अल्बम मला देईल. मी त्याच्या एवढी मागे लागली होती की मी स्वतः कॉम्प्युटरवर सगळे फोटो सिलेक्ट केले होते ते फोटोज पेनड्राइव्हमध्ये घेतले. आता सारंगला फक्त पेनड्राइव्ह काकांना नेऊन द्यायचा होता. पण, ही गोष्ट सारंगला ११ वर्षात जमलेली नाहीये. साखरपुड्याचे फोटो आहेत पण, लग्नातील फोटो नाहीयेत. असं प्रियांकाने सांगितलं. यावर, आता लवकरच मी लग्नाच्या फोटोंचा अल्बम बनवून घेईन आणि फोटो शेअर करेन असं सारंगने सांगितलं.



# 'द ट्रॅप'मध्ये 'राणा दा'चा खतरनाक लूक

'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेत साध्या भोळ्या 'राणा दा'ची भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या हार्दिक जोशीचा आता एक 'खतरनाक' लूक समोर आला आहे. त्याच्या आगामी 'द ट्रॅप' या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर रिलीज करण्यात आले आहे. या पोस्टरमध्ये हार्दिकचा रांगडा पण तितकाच खतरनाक अंदाज पाहायला मिळतोय. हा एक सस्पेन्स ॲक्शन- थ्रिलर चित्रपट असल्याचे बोलले जात असून, हार्दिकला अशा वेगळ्या भूमिकेत पाहण्यासाठी त्याचे चाहते प्रचंड उत्सुक आहेत. लोकप्रिय टीव्ही अभिनेता आणि 'तुझ्यात जीव रंगला' फेम हार्दिक जोशी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. 'राणा दा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हार्दिकने आता मोठ्या पडद्यावर धमाका करण्याची तयारी केली आहे. त्याच्या आगामी 'द ट्रॅप' (The Trap) या चित्रपटाचे नवीन पोस्टर नुकतेच लाँच करण्यात आले असून, यात त्याचा कधीही न पाहिलेला 'स्वॅग' पाहायला मिळत आहे. हार्दिकच्या बहुप्रतीक्षित 'द ट्रॅप' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाचे पहिले पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले आहे. या पोस्टरवरील प्रत्येक पात्र काहीतरी लपवतंय. प्रत्येक चेहरा खरा आहे की मुखवटा हे ओळखणं कठीण होत जातं. प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये हार्दिक जोशी अत्यंत गंभीर आणि आक्रमक भूमिकेत दिसत आहे. त्याच्या डोळ्यातील चमक आणि हातातील स्टाईल पाहून हा चित्रपट जबरदस्त ॲक्शनने भरलेला असेल, असा अंदाज लावला जात आहे. सिनेसृष्टीला एक नवा आणि दमदार चेहरा मिळत आहे. अभिनेता सुजित जाधव. या चित्रपटातून मराठी चित्रपटसृष्टीत सुजित आपले पदार्पण करत आहेत. चित्रपटात जेष्ठ आणि कसलेले अभिनेते मोहन जोशी, संजय खापरे, श्याम मोहिते, स्वाती लिमये ही कलाकार मंडळी दिसणार आहेत. 'द ट्रॅप' चित्रपटाची निर्मिती योगेश रामचंद्र जाधव, कथा आणि दिग्दर्शन अमोल लक्ष्मण खापरे यांनी केले आहे. पटकथा संवाद आणि गिते अभिजीत रूपा राजेंद्र कोळेकर यांनी लिहले असून क्रिएटिव्ह दिग्दर्शक निरंजन पत्की, संगीत नितीन उगलमुगले यांचे आहे. कार्यकारी निर्माते रत्नेश पन्हाळकर, मेकअप विशाखा शिंदे आणि विशाल निघोळ यांचे आहे. हा चित्रपट १० एप्रिल, २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# 'सालबर्डी'त गश्मीर महाजनी गोंधळीच्या रूपात



पूजा सावंत मुख्य भूमिकेत असलेला 'सालबर्डी' सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या सिनेमात पूजा डॅशिंग महिला पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारताना दिसणार आहे. 'सालबर्डी' सिनेमात मराठी अभिनेता गश्मीर महाजनी एका वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. गावोगावी फिरून आई जगदंबेचा जागर करणारे गोंधळी म्हणजे आपल्या लोकसंस्कृतीचा महत्वाचा घटक. त्यांची भक्ती, त्याची ऊर्जा आपल्यातही चैतन्य निर्माण करते. 'सालबर्डी' या मराठी चित्रपटात अभिनेता गश्मीर महाजनी दमदार गोंधळी साकारताना दिसणार आहे. 'सालबर्डी'मधील गश्मीरचं जगदंबे हे गोंधळी गाणं नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे. या नृत्यात गश्मीरने पारंपरिक वेशभूषा, प्रभावी देहबोलीसह कमालीचा नृत्याविष्कार सादर केला आहे. जगदंबेचा हा गोंधळ कथानकात थरार वाढवणारा ठरणार आहे.

संबळाच्या ठेक्यावर रहस्यमय वातावरणात गश्मीरची एन्ट्री वेगळीच रंगत वाढविणारी आहे. गीतकार मुकुंद भालेराव यांच्या लेखणीतून सजलेल्या या गोंधळाला संगीतकार पद्मनाभ गायकवाड यांचा संगीतसाज आहे. अजय गोगावले यांचा दमदार स्वर गाण्याला लाभला आहे. हा गोंधळ आशिष पाटील यांनी आपल्या सदाबहार अदाकारीने नृत्यदिग्दर्शित केला आहे. गावातील गूढ शांततेच्या आड दडलेलं जीवघेणं रहस्य उलगडण्यासाठी हा गोंधळी येतोय का? अशा प्रश्नांची उत्सुकता यामुळे निर्माण झाली आहे. याबद्दल बोलताना गश्मीर महाजनी म्हणतो, गोंधळ ही केवळ परंपरा नाही, तर देवीभक्तीची एक ऊर्जादायी अभिव्यक्ती आहे. 'सालबर्डी'मधील माझा गोंधळी हा कथानकाला वेगळी दिशा देणारा महत्वाचा दुवा आहे. गोंधळ गीतामध्ये असलेली ऊर्जा, नाद आणि पारंपरिक वातावरण यामुळे शूटिंग करतानाच अंगावर रोमांच उभे राहत होते. प्रेक्षकांनाही हा अनुभव नक्कीच जाणवेल. महाराष्ट्रातील दुर्गम भागात वसलेल्या 'सालबर्डी' गावात घडणाऱ्या रहस्यमय घटनांचा थरारक शोध घेणारा 'सालबर्डी' हा चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारण्यात आला आहे.

या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून, चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा रमेश साहेबराव चौधरी यांनी सांभाळली आहे. 'सालबर्डी' चित्रपटात पूजा सावंत, शशांक शेंडे, ओंकार भोजने, भारत गणेशपुरे, अंशुमन विचारे, रोहित कोकाटे, कमलाकर सातपुते, चित्तरंजन गिरी, अनिल नगरकर, माधव अभ्यंकर, प्रवीण डाळिंबकर, अभय गिते, राजेंद्र सातार्डेकर, कोमल चौधरी या कलाकारांच्या भूमिका आहेत.

# कलाकारांना भेटणं आज सोप्प नाही

चित्रपटसृष्टीचं स्वरूप आता पूर्णपणे बदललं असून, कलाकारांच्या अवाजवी मागण्यांमुळे निर्मात्यांचे बजेट कोलमडत असल्याचं मत दिग्दर्शक प्रकाश झा आणि ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी व्यक्त केलं आहे. 'सत्याग्रह' आणि 'राजनीती' सारखे सुपरहिट चित्रपट देणारे प्रकाश झा आता चित्रपटगृहांऐवजी ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती का देत आहेत, याचा उलगडा त्यांनी एका मुलाखतीत केला. यावेळी नाना पाटेकरांनी कलाकारांच्या मॅनेजमेंट टीमवर ताशेरे ओढत, आजच्या पिढीतील कलाकार आणि दिग्दर्शकांमध्ये कोणतेही जिव्हाळ्याचे संबंध उरले नसल्याची खंत बोलून दाखवली. मुलाखतीत नाना पाटेकर म्हणाले, मॅनेजमेंटच्या अनेक स्तरांमुळे सध्याच्या काळात मोठ्या कलाकारांशी संपर्क साधणंच कठीण झालंय. पूर्वी तुम्ही एखाद्या कलाकाराशी थेट बोलू शकत होतात, पण आता तसं नाही. आज एखाद्या कलाकाराला भेटण्यासाठी आपल्याला अनेक लोकांच्या माध्यमातून जावं लागतं. कलाकाराला भेटण्यापूर्वी तुम्हाला आधी १०० लोकांना भेटावं लागतं. मग तुम्हाला त्या कलाकाराकडे चित्रपटाची स्क्रिप्ट द्यावी लागते, नंतर तो कलाकारच तुम्हाला सांगतो की, तुम्ही हा चित्रपट बनवायला हवा की नाही. या सर्व प्रक्रियेच्या तुलनेत, चित्रपट थेट ओटीटीवर प्रदर्शित करणे अधिक सोपं आहे. आताच्या पिढीतील कलाकार आणि दिग्दर्शक यांच्यात कोणतेही जिव्हाळ्याचे संबंध उरलेले नाहीत, असं नाना पाटेकरांना वाटतं. अनेकदा मी प्रकाशला विचारतो की, अमुक एखाद्या अभिनेत्याने त्याला फोन केला होता का? त्यावर तो मला सांगतो की, त्या अभिनेत्याचं आणि त्याचं नातं फक्त त्या चित्रपटापुरतंच होतं. फक्त मी आणि अमिताभ बच्चन दोघेच त्याला फोन करतो, असं प्रकाश सांगतो, असं नाना पाटेकर म्हणाले. मॅनेजमेंटच्या विळख्यामुळे खर्च वाढतो, असं प्रकाश झा यांनी स्पष्ट केलं. कॉर्पोरेट, मॅनेजमेंट कंपनी, क्रिएटिव्ह कंपनी, मॅनेजर या सर्वांना कलाकारांकडून पगार मिळतो आणि म्हणूनच त्यांना काहीतरी काम करतोय हे दाखवावं लागतं, असं प्रकाश झा म्हणाले.





# श्रद्धा कपूर लग्न करतेय?

श्रद्धा कपूर बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. श्रद्धाचा मोठा चाहतावर्ग आहे. श्रद्धाच्या लव्ह लाईफबद्दल तर चाहत्यांमध्ये फार उत्सुकता असते. श्रद्धा कपूर ही लेखक राहुल मोदी याला डेट करत आहे. त्यांच्या लग्नाच्याही चर्चा रंगताना दिसून येतात. अशातच आता श्रद्धाच्या लग्नाबद्दल तिची मावशी तेजस्विनी कोल्हापुरे यांनी भाष्य केलंय. तेजस्विनी कोल्हापुरे यांनी श्रद्धाच्या लग्नाच्या चर्चेवर आश्चर्य व्यक्त केलं. त्या म्हणाल्या, खरंच? मला याबद्दल काहीच माहिती नाही. मला तर याची कल्पनाही नाही. तेजस्विनी यांनी श्रद्धाचं कौतुक करताना सांगितलं की, तिने आपल्या कुटुंबाची परंपरा उत्तम प्रकारे पुढे नेली आहे. श्रद्धाने ज्या पद्धतीने कुटुंबाचं नाव उज्ज्वल केलं आहे, त्याचा मला खूप अभिमान आहे, असंही त्या म्हणाल्या. तेजस्विनी यांनी पुढे सांगितलं की, त्या आणि श्रद्धा एकमेकींच्या कामाबद्दल चर्चा करतात. शूटिंगदरम्यानचे फोटो, व्हिडीओ तसेच वेगवेगळ्या चित्रपटांमधील लुक्स त्या एकमेकींना शेअर करतात. श्रद्धा कपूर आणि राहुल मोदी यांच्या नात्याबाबत २०२४ पासून चर्चा सुरू आहे. दोघांना अनेकदा डिनर डेट, व्हेकेशन आणि इव्हेंट्समध्ये एकत्र पाहण्यात आले आहे. मात्र, त्यांनी अद्याप त्यांच्या लग्नाची अधिकृत घोषणा केलेली नाही. तरीही त्यांची केमिस्ट्री चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय ठरते. राहुल मोदी हे लेखक आणि फिल्ममेकर आहेत. तर श्रद्धाच्या कामाबद्दल बोलायचं झाल तर ती लवकरच आगामी 'ईठा' या चित्रपटात झळकणार आहे.

# साउथ सिनेमात 'या' डॅशिंग हिरोचीही एन्ट्री?

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शकांपैकी एक असलेले शंकर आपल्या ड्रीम प्रोजेक्टची तयारी करत आहेत . 'वेलपारी' असं सिनेमाचं नाव आहे. या सिनेमात साउथ हिरो धनुष दिसणार आहे. दिग्दर्शक शंकर यांनी दुसरा हिरो बॉलिवूडमधून घेण्याचं ठरवलं आहे. आता धनुषसोबत आघाडीचा अभिनेता सेकंड लीड रोल करणार आहे. आधी सिनेमात धनुषचं नाव समोर आलं. मात्र यामध्ये आणखी एका मुख्य अभिनेत्याची गरज आहे. हा अभिनेताही बडा असावा अशी त्यांची इच्छा आहे. सुरुवातीला रणवीर सिंहच्या नावाची चर्चा झाली. मात्र आता विकी कौशलच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. दिग्दर्शक शंकर हे विकी कौशलच्या 'छावा'मधील अभिनयामुळे प्रभावित झाले आहेत. 'वेलपारी'साठी धनुषचं नाव कन्फर्म आहे. त्याच्याकडून दोन वर्षांचा वेळ आणि कॉल शीट मागवली आहे. यानंतरच त्याची भूमिका कन्फर्म होणार आहे. वेलपारी हा मोठा प्रोजेक्ट आहे. वेलपारीची कथा एका कादंबरीवर आधारित आहे. सु वेंकटेशन यांनी ती लिहिली आहे ज्याचं नाव 'वीरा युग नायकन वेल पारी' असं आहे. इसवी सन पूर्व ते तिसर्या शताब्दी इसवीपर्यंतच्या बॅकड्रॉप सिनेमाची कहाणी आहे. परंबू नाडूचे परोपकारी सरदार वेलपारीची ही गोष्ट आहे. हे तेच आहेत ज्यांनी चेरा चोला आणि पांड्या राजांची विरोध केला होता. वेलपारी यांचं धाडस, पर्यावरणाप्रती असलेली आत्मियता, राजांच्या विरोधात युद्ध असं सगळं आहे. दिग्दर्शक शंकर यांचा आधीचा सिनेमा गेम चेंजर होता ज्यामध्ये अभिनेता राम चरण मुख्य भूमिकेत होता. त्याच्यासोबत कियारा अडवाणी दिसली होती. मात्र प्रेक्षकांना हा सिनेमा आवडला नाही.

